# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ९० / २०२४

वीज देयक दुरुस्त करुन मिळण्याबाबत

मिनाक्षी महेश अंचितमाने ........................................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादीत (महावितरण) ........................................ प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १. मिनाक्षी महेश अंचितमाने
२. महेश अंचितमाने

प्रतिवादीतर्फे :-
१. विजय पाटील, कार्यकारी अभियंता
२. प्रकाश पाटील, उपकार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- २० जून २०२४

आदेश पारित दिनांक :- २० सप्टेंबर २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लेकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण बारामती परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक २८ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी दाखल केले. मंचाने पारित केलेला आदेश खालीलप्रमाणे.

*"१) तक्रार नामंजूर करण्यात येत आहे.*

*२) ग्राहकास वीज देयक भरण्याकरीता महावितरणच्या नियमानुसार हफ्ते देण्यात यावे."*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २० जून २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वार सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे गट न. २६३ गोपाळपूर तालूका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील २०११ सालापासून महावितरणचे १० एच. पी. चे शेती ग्राहक (क्रं. ३३७८८००२३२०) आहेत. अपिलार्थीने सदर वीज जोडणी शेतातील विहीरीसाठी घेतलेली आहे. अपिलार्थीने नमुद केले की, ते मुंबईमध्ये राहत असल्यामुळे त्यांचे वडील शेतीची देखेरेख करत होते. परंतू अपिलार्थीच्या वडीलांची तब्येत बिघडली व वयोमानानुसार तब्येतीच्या तक्रारीस्तव अपिलार्थीने स्वतः शेतीकडे लक्ष देणे सुरू केले.

- शेतीच्या वीजजोडणीच्या देयकाचे निरीक्षण केले असता देयकावर १० एच.पी. मंजूर भार असल्याचे व शेतीच्या वीजजोडणीच्या मीटरचे रिडींग वर्षानूवर्षे घेतले नसल्याचे लक्षात आले. अपिलार्थीने नमुद केले की, त्यांना १० एच.पी. भारानुसार ची सरासरी वीज देयके देण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनात आल्यावर त्यांनी त्यांच्या शेतातील कामगाराकडे याबाबत विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीच्या शेतात ५ एच.पी.ची मोटर चालत असल्याचे सांगितले. शेतात डिसेंबर २०१६ पासून मीटर नसल्याने व अपिलार्थीना RNT व No Meter या स्टेटस प्रमाणे वीज देयके पाठविली जात होती.

- अपिलार्थीने त्यांच्या शेतातील वीज जोडणी भार १० एच.पी. नसून वीज जोडणी घेतल्यापासून ५ एच.पी. मोटर असल्यामुळे वीज देयकावर ५ एच.पी. भारची नोंद करावी याबाबत दिनांक १३ जुलै २०२१ रोजी इमेल द्वारे महावितरण पंढरपूर ग्रामीण उपविभाग १ कार्यालयात तक्रार दाखल केली. तसेच या अगोदर वर्षानूवर्षे रिडींग न घेता १० एच.पी. मंजूर भाराची सरासरी दर्जाची माहे डिसेंबर २०१६ पासून वीज देयके जारी करण्यात आली आहेत, त्या वीज देयकांची दुरूस्ती करून देण्यात यावी अशी विनंती केली.

- अपिलार्थीने नमुद केले की, डिसेंबर २०१६ पासून शेतात मीटर बसविले असते तर मीटर रिडींगनुसार वीज देयके आली असती. तसेच, पंढरपूर विभागात मागील पाच सहा वर्षात पाऊसाचे प्रमाण कमी असल्यामुळे भुगर्भ जलपातळी खाली असल्यामुळे शेतातील व विहीरीला पाणी कमी असल्यामुळे अपिलार्थी शेती करत नव्हते, शेतीपासून उत्पन्न नसल्यामुळे अपिलार्थी सदर वीज देयकांचा भरणा करू शकले नाही.

- त्यानंतर महावितरणच्या अभियंताने वीज जोडणीची तपासणी केली असता, घटनास्थळी मीटर नसल्याचे निदर्शनास आले, वीज जोड भार हा ५ एच.पी.चा असल्याचे लक्षात आले. त्यानुसार

प्रतिवादीने त्यांच्या वरीष्ठ कार्यालयाला तसा अहवाल सादर करून अपिलार्थीच्या शेतामध्ये नवीन मीटर बसवून दिला.

- डिसेंबर २०२१ च्या वीज देयकात मंजूर भार ५ एच.पी. केल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर जुलै २०२२ चे रु.२,१६,८५०/- या रक्कमेचे वीज देयक ऑगष्ट २०२२ मध्ये मिळाले. परंतू आधी जारी केलेली १० एच.पी. ची सरासरी जर्दाची वीज देयकांची दुरूस्ती न केल्याचे निदर्शनास आले.

- वीज देयके दुरूस्ती करून देण्यात आली नाहीत; म्हणून दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी मंचाकडे तक्रार दाखल केली व मंचाकडे १० एच.पी. भाराच्या सरासरीनुसार देण्यात आलेली वीज देयके ५ एच.पी. भारानुसार दुरूस्त करून देण्यात यावी, तसेच, वीज देयकावरील व्याज माफ करून हफ्त्यामध्ये वीज देयकांची रक्कम भरण्याची मुभा मिळावी, अशी मागणी केली. परंतू मंचाने दिनांक २८ डिसेंबर २०२३ रोजीच्या आदेशान्वये गाऱ्हाणे नामंजूर करताना ग्राहकास वीज देयक भरण्याकरीता महावितरणच्या २०१६ नियमानुसार हफ्ते देण्यात यावे असे निर्देश दिले.

- मंचाच्या आदेशाविरूध्द अपिलार्थीने दिनांक २२ एप्रिल २०२४ रोजी अभिवेदन दाखल केले. त्यात पुर्वीची जारी केलेली सर्व सरासरी वीज देयके सध्या बसविण्यात आलेल्या मीटर रिडींगनुसार दुरूस्ती करून देण्यात यावी अशी मागणी केली.

- अपिलार्थीने दिनांक २७ ऑगष्ट २०२२ रोजी पुन्हा सध्याचे वीज देयक नवीन मीटर रिडींग नुसार करून देण्यात यावे; तसेच, या अगोदरचे १० एच.पी. भाराची सरासरीनुसार देण्यात आलेली वीज देयके ५ एच.पी. भारानुसार दुरूस्त करून देण्यात यावी अशी विनंती केली.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक २० जून २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे गट न. २६३ गोपाळपूर तालूका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील २०११ सालापासून महावितरणचे १० एच. पी. चे शेती ग्राहक (क्रं. ३३७८८००२३२०) आहेत. अपिलार्थीने सदर वीज जोडणी शेतातील विहीरीसाठी घेतलेली आहे.

- अपिलार्थीस २०११ सालापासून ते सप्टेंबर २०१६ पर्यंत मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात आली. अपिलार्थीने त्यापैकी कोणत्याही वीज देयकाचा भरणा केलेला नाही. डिसेंबर २०१६

पासून अपिलार्थीचे मीटर साईटवर उपलब्ध नव्हते म्हणून RNT व No Meter या स्टेटसखाली सप्टेंबर २०२२ पर्यंत वीज देयके देण्यात आली.

- अपिलार्थीने त्यांचा मंजूर भार १० एच पी ऐवजी ५ एच पी करण्याची विनंती डिसेंबर २०२१ रोजी प्रतिवादींकडे केली. त्यानुसार डिसेंबर २०२१ मध्ये अपिलार्थीचा मंजूर भार १० एच पी ऐवजी ५ एच पी करण्यात आला.

- त्यापुर्वी दिनांक १८ फेब्रुवारी २०२२ रोजी जूना मीटर क्रं.०५१४४५२६ हा नवीन मीटरने (क्रमांक ०३४७७०८) ने बदलण्यात आला होता. तथापि, प्रतिवादीनी संगणक प्रणालीमध्ये मीटर क्रं.४२८९१७१८ चुकीच्या पध्दतीने प्रविष्ठ केला. सदर चूक दिनांक ३० ऑगष्ट २०२२ रोजी दुरूस्त करण्यात आली.

- डिसेंबर २०२२ पासून अपिलार्थीस नवीन मीटरच्या रिडींगनुसार वीज देयके देण्यात येत आहेत. तक्ता क्रं.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अपिलार्थीस ५८७०७ (५१५७२ यनीटस ज़ुन्या मीटरची १० एच पी भाराप्रमाणे असेसमेंट व ६९३५ युनीटस, (नवीन मीटर प्रमाणे)) असे एकुण ४८ महिन्याचे लॉक क्रेडीटची ॲडजेस्टमेंट रू.१,१७,१८७.५४ देण्यात आली. लॉक क्रेडीटची ॲडजेस्टमेंट दिल्यानंतर ही अपिलार्थीने २०११ पासून कोणतेही वीज देयकाचा भरणा केला नसल्यामुळे अपिलार्थीची एकुण थकबाकी २,४७,३३३/- एवढी राहीली. त्यातील मुळ (प्रिन्सिपल) रक्कम रू.१३३८६०/- इतकी आहे व एकुण व्याज रू.११३४७३/- इतके आहे.

- मागील सरासरीनुसार जारी केली गेलेली वीज देयके ही जुन्या मीटरचे रिडींग उपलब्ध होऊ न शकल्याने अपिलार्थीचा जो १० एच.पी.मंजूर भार आहे त्यानुसार दिलेली आहेत. तेथील वीज वापर आहे किंवा नाही याची नोंद नाही. मात्र महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम 2003) मधील कलम १५.१५.४ नुसार सरासरी वीज देयके पाठविण्याची तरतूद असल्याने, त्यानुसार वीज देयके ही रिडींगनुसार ४८ महिन्यात दुरूस्त करून देण्यात आलेली आहेत. त्यामुळे मागील सर्व वीज देयके १० एच.पी. भारानुसार आकारण्यात आली आहेत व ती योग्य आहेत.

- अपिलार्थीने २४ नोव्हेंबर २०११ पासून आतापर्यंत दिनांक २५ मे २०२१ फक्त रू.५०००/- चा भरणा केला आहे याची कृपया नोंद घ्यावी.

- प्रतिवादींनी विनंती केली की, अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

विश्लेषण व निर्णय

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले. अपिलार्थी हे गट न. २६३ गोपाळपूर तालूका पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील महावितरणचे १० एच. पी. चे शेती ग्राहक (क्रं. ३३७८८००२३२०) आहेत.

५. अपिलार्थीच्या सीपीएल वरून तयार केलेली माहिती तक्त्यात दर्शविली आहे.

तक्ता क्रं.१

| Meenakshi Mahesh Anchanmane Cons. No. 337880002320 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Period | June 2014 to March 2019 | | | June 2019 to March 2024 | | | |
| Month | Current Reading in CPL (KWH) | Cons. (Units) | Meter Status | Month | Current Reading in CPL (KWH) | Cons. (Units) | Meter Status |
| Jun-14 | 43631 | 5370 | Normal | Jun-19 | 81101 | 4540 | R.N.T. |
| Sep-14 | 47531 | 3900 | Normal | Sep-19 | 81101 | 4800 | R.N.T. |
| Dec-14 | 52121 | 4590 | Normal | Dec-19 | 81101 | 3900 | R.N.T. |
| Mar-15 | 56651 | 4530 | Normal | Mar-20 | 81101 | 3900 | R.N.T. |
| Jun-15 | 61901 | 5250 | Normal | Jun-20 | 81101 | 5700 | R.N.T. |
| Sep-15 | 66701 | 4800 | Normal | Sep-20 | 81101 | 4500 | R.N.T. |
| Dec-15 | 71201 | 4500 | Normal | Dec-20 | 81101 | 3750 | R.N.T. |
| Mar-16 | 75101 | 3900 | Normal | Mar-21 | 81101 | 5400 | R.N.T. |
| Jun-16 | 77501 | 2400 | Normal | Jun-21 | 81101 | 5400 | R.N.T. |
| Sep-16 | 81101 | 3600 | Normal | Sep-21 | 81101 | 5100 | R.N.T. |
| Dec-16 | 81101 | 3300 | R.N.T. | Dec-21 | 81101 | 3900 | R.N.T. |
| Mar-17 | 81101 | 5010 | No Meter | Mar-22 | 0 | 2550 | R.N.T. |
| Jun-17 | 81101 | 5010 | No Meter | Jun-22 | 0 | 2700 | R.N.T. |
| Sep-17 | 81101 | 5010 | R.N.T. | Sep-22 | 0 | 2850 | R.N.T. |
| Dec-17 | 81101 | 4050 | R.N.T. | Dec-22 | 6935 | 58707 $ | Normal |
| Mar-18 | 81101 | 4950 | R.N.T. | Mar-23 | 6935 | 0 | Normal |
| Jun-18 | 81101 | 4950 | R.N.T. | Jun-23 | 6935 | 3000 | R.N.T. |
| Sep-18 | 81101 | 4950 | R.N.T. | Sep-23 | 7914 | 979 | Normal |
| Dec-18 | 81101 | 4950 | R.N.T. | Dec-23 | 11259 | 3345 | Normal |
| Mar-19 | 81101 | 4950 | R.N.T. | Mar-24 | 14607 | 3348 | Normal |
| | | | | Jun-24 | 17232 | 2625 | Normal |
| Note | 1.R.N.T.: Reading Not Taken | | | | | | |
| | 2. Meter( No. 05144526) was replaced by new Meter (No.0347708 ) on 18/02/2022 . However, the Respondent wrongly entered Meter No.42891718 into the system . This mistake was rectified on 30/08/2022. | | | | | | |
| | The Appellant was billed for 58707 (= 51572 units of old meter Cons. assessed + 6935 units recorded on new meter (No.0347708 ) up to Dec. 2022. | | | | | | |
| | $ Lock Credit of 48 months was released in Dec. 2022 bill as per developed consumption of 51572 units considering 10 HP Agricultural Index and 6935 units on new meter total comes to 58707 units (1223 unis per month).The credit of (-) Rs.1,17,187.54 was released to the Appellant by the System. | | | | | | |
| | 4. The sanctioned load was reduced from 10 HP to 5 HP from Dec. 2021onwards as per CPL Data. | | | | | | |
| | 5. This consumption from quarters of Dec. 15 to Sep.16 ( One year) was 14400 units i.e. 1200 units per month, when the old meter was working | | | | | | |
| | 6.Ths consumption from quarters of Sep. 23 to Jun. 24 ( One year) was 10297 units i.e. 858 units per month, when the old meter was working | | | | | | |

अपिलार्थीने नमुद केले की, अपिलार्थीचा वीज भार हा ५ एच.पी चा आहे तथापि, वीज देयकावर मंजूर भार १० एच.पी चा दाखविण्यात आला आहे. अपिलार्थीस २०११ सालापासून ते सप्टेंबर २०१६ पर्यंत मीटर वाचनाप्रमाणे वीज देयके देण्यात आली. त्यानंतर डिसेंबर २०१६ पासून मीटर नसल्याने व अपिलार्थीना RNT व No Meter या स्टेटस प्रमाणे सप्टेंबर २०२२ पर्यंत वीज देयके पाठविली. अपिलार्थीचा मीटर साईटवरून कोणी नेला याबाबत अपिलार्थीना काहीही माहिती नाही. मीटर नसताना अपिलार्थीस सरासरीप्रमाणे वीज देयके पाठविण्यात आली. प्रतिवादीने फेब्रुवारी २०२२ मध्ये नवीन मीटर बसविला; तथापि, सिस्टीममध्ये चुकीच्या मीटर क्रमांकाची नोंद करण्यात आली. सदरहू नोंद ऑगष्ट २०२२ मध्ये दुरूस्त करण्यात आली. अपिलार्थीस १० एच पी मंजूर भार विचारात घेऊन ४८ महिन्यांची सरासरी वीज देयके देण्यात आली, ती ५ एच पी मंजूर भार विचारात घेऊन दुरूस्त करण्याची विनंती केली.

६. प्रतिवादीने नमुद केले की, डिसेंबर २०२२ पासून अपिलार्थीस नवीन मीटरच्या रिडींगनुसार वीज देयके देण्यात येत आहेत. तक्ता क्रं.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अपिलार्थीस ५८७०७ (५१५७२ यनीटस जुन्या मीटरची १० एच पी भाराप्रमाणे असेसमेंट व ६९३५ युनीटस, (नवीन मीटर प्रमाणे)) असे एकुण ४८ महिन्याचे लॉक क्रेडीटची ॲडजेस्टमेंट रू.१,१७,१८७.५४ देण्यात आली. लॉक क्रेडीटची ॲडजेस्टमेंट दिल्यानंतर ही अपिलार्थीने २०११ पासून कोणत्याही वीज देयकाचा भरणा केला नसल्यामुळे अपिलार्थीची एकुण थकबाकी रू.२,४७,३३३/- इतकी राहीली. त्यातील मुळ (प्रिन्सिपल) रक्कम रू.१,३३,८६०/- इतकी आहे व एकुण व्याज रू.१,१३,४७३/- इतके आहे.

७. तक्ता क्रं. १ चे अवलोकन केले असता अपिलार्थीस सप्टेंबर २०१६ पर्यंत मीटर वाचना प्रमाणे योग्य ती वीज देयके देण्यात आली. त्यावेळची एकुण थकबाकी रू.१,०१,९६८/- इतकी होती. तदनंतर डिसेंबर २०१६ ते सप्टेंबर २०२२ पर्यंत अपिलार्थीना RNT व No Meter या स्टेटस प्रमाणे सप्टेंबर २०२२ पर्यंत वीज देयके पाठविण्यात आली. डिसेंबर २०२२ या त्रैमासिक कालावधीत ५८७०७ (५१५७२ यनीटस जुन्या मीटरची १० एच पी भाराप्रमाणे असेसमेंट व ६९३५ युनीटस, (नवीन मीटर प्रमाणे) युनीटसचे) असे एकुण ४८ महिन्याचे लॉक क्रेडीटची ॲडजेस्टमेंट रू.१,१७,१८७.५४ देऊन वीज देयक पाठविण्यात आले. त्यावेळी अपिलार्थीची एकुण थकबाकी रू.२,४७,३३३/- एवढी राहीली.

८. अपिलार्थीचा जुना मीटर सुसिस्थीत चालत असताना डिसेंबर २०१५ ते सप्टेंबर २०१६ या एक वर्षाच्या कालावधीत १४४०० (४५००+३९००+२४००+३६००) युनीटसचा (दरमहा १२००) वापर झाल्याचे निदर्शनात येते. तसेच नवीन मीटर सप्टेंबर २०२३ ते जून २०२४ या कालावधीत १०२९७ (९७९+३३४५+३३४८+२६२५) युनीटस (दरमहा ८५८) वापर असल्याचे आढळून आले. अपिलार्थीचे ४८ महिन्याचे वीज देयके ही प्रतिमहा ८५८ x ३ =२५७४ (त्रैमासिक) वापराप्रमाणे सुधारीत करण्याची गरज आहे.

९. वरील सर्व बाबींचा उहापोह करता प्रतिवादीना खालील प्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे.

- डिसेंबर २०१६ (त्रैमासिक) ते सप्टेंबर २०२२ (त्रैमासिक) या कालावधीतील वीज देयके ८५८ x ३ = २५७४ (त्रैमासिक) वापराप्रमाणे सुधारीत करण्यात यावीत.
- डिसेंबर २०१६ ते आदेशाच्या तारखेपर्यंतच्या कालावधीतील व्याज व विलंब आकार माफ करण्यात यावा.
- सुधारीत वीज देयके अपिलार्थीस सहा समान हफ्त्यात विना व्याज व विलंब आकाराशिवाय भरण्याची परवानगी देण्यात येत आहे.
- अपिलार्थीच्या इतर मागण्या नामंजूर करण्यात येत आहेत.
- वरील बाबतचा अनुपालन अहवाल आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्याच्या कालावधीत पाठविण्यात यावा.

१०. या कार्यालयातील सचिवाना आदेशीत करण्यात येत आहे की, अपिलार्थीने भरलेली अनामत रक्कम रु.२५०००/- प्रतिवादीकडे अपिलार्थीच्या वीज देयकात समाविष्ट करण्यासाठी पाठविण्यात यावी.

११. अपिलार्थीचे अभिवेदन निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
वन्दना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)